# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवासी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. महाराष्ट्र राज्य/मुंबई/११६६/२०१२ जी.बी.बी.एस.डी.


दि. १९ एप्रिल २०१४

प्रति,

मा. मुख्य अभियंता,
विकास आराखडा (डी.पी.)
बृहन्मुंबई महानगरपालिका,

विषय : नियोजीत बृहन्मुंबई विकास आराखड्यातील के-पश्चिम प्रभाग (K/W - 2.05) संदर्भात पत्राद्वारे सूचना.

महोदय / महोदया,

सन २०१४ - २०३४ चा बृहन्मुंबई महानगर प्रस्तावित नियोजीत आराखड्याचे प्रारूप सर्वसाधारण जनतेच्या सूचना: माहिती करिता आपण उपलब्ध करुन दिले आहेत सदर प्रारूप आराखड्यातील K/W - 2.05 ह्या प्रभागातील सरदार वल्लभभाई पटेल नगर वसाहतीसंदर्भात काहि प्रस्ताव आम्ही देऊ इच्छितो ते पुढील प्रमाणे :

1. सदरहू वसाहत म्हाडा प्राधिकरणाने जागतिक बँक प्रकल्पांतर्गत उभारलेली असून त्यामध्ये LIG प्रवर्गातील ६०% व उर्वरीत HIG, MIG प्रवर्गातील घरे आहेत.

2. सदर वसाहतीवर नियोजीत आराखड्यात "SC" अर्थात झोपडपट्टी आणि समूह अशा प्रकारचे आरक्षण दाखविले आहे. प्रत्यक्षात सदर वसाहत -



Scanned with CamScanner

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवासी वेल्फेअर असोसिएशन

॥ एकमेका सहाय्य करू । अवघे धरू सुपंथ ॥

नोंदणी क्र. महाराष्ट्र राज्य / मुंबई / ११६६ / २०१२ जी.बी.बी.एस.डी.

---

ही म्हाडा प्राधिकरणाची असून येथे झोपडपट्टी असण्याचा प्रश्न उद्भवत नाहि. तसेच संपूर्ण वसाहतीमध्ये ९१ सहकारी संस्थांचे cluster असल्याकारणे अशा प्रकारचे आरक्षण निव्वळ काहि संस्थांवर (संस्था क्र. ३ ते २५) वर टाकणे संयुक्तिक नाहि

३. तसेच अहवालातील नकाशा क्र. १७ मध्ये अ.क्र. ८ मध्ये म्हाडा वसाहतींकरिता आपण ४ चटईक्षेत्र प्रस्तावित केले आहे याचे आम्ही स्वागत करतो.

४. सदर वसाहतीचा आलेख आपण Existing Land Use Survey प्रमाणे आपण केला आहे असे मानतो. परंतू सद्य परिस्थितीमध्ये निव्वळ "R" झोन आपण दाखविले आहे परंतू सद्य परिस्थितीमध्ये वसाहतीमध्ये HIG बंगलो ये मध्ये १००% व्यावसायिक वापर होत आहे आणि सहकारी गृह निर्माण संस्थांमध्ये काहि प्रमाणात व्यावसायिक वापर होत आहे परिणामी याचाहि उल्लेख आपल्या प्रारूप आराखड्यात करावा

५. प्रति माणसी मोकळ्या जागे प्रमाणे केन्द्रीय नगर विकास खात्यांच्या निर्देशानुसार उपलब्ध करण्याचा प्रयत्न करावा.

कळावे,

received
[illegible]
VP(N)(W)
19/8/19

"सरदार वल्लभभाई पटेल नगर रहिवासी वेल्फेअर असोसिएशन"

| अध्यक्ष | सेक्रेटरी | खजिनदार |
|---|---|---|
| आनंद जाधव | सुमित ननावरे | अनिल परदेशी |
| ९९६७०५४०५४ | ९८२१७२७९९९ | ९७७३०५२४१८ |

---



Scanned with CamScanner

O/C

# सरदार वल्लभाई पटेल नगर
# रहिवासी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. महाराष्ट्र राज्य / मुंबई/ १९६६/ २०१२ जी.बी.बी.एस.डी.

दिनांक:१६/३/२०१५

प्रति,

कार्यकारी अभियंता (विकास आराखडा पुनर्रचना),

c/o मुख्य अभियंता (विकास आराखडा),

५ वा माळा, ऍनेक्स इमारत,

महानरपालिका मुख्यालय, महानगरपालिका मार्ग,

फोर्ट, मुंबई -१,

**विषय :- पूर्नरचिन बृन्हमुंबई विकास आराखडातील के- पश्चिम प्रभाग ELU नकाशा भाग III मधील K/W-२.०५ मधील सरदार वल्लभाई पटेल नगर म्हाडा वसाहतीमधील सहकारी गृह. संस्था क्र ३ ते २५ वरिल झोपडपट्टी समुह अर्थात "SC" चे आरक्षण उठविण्याबाबत हरकत / सुचना .**

महोदय,

आपल्या विभागातर्फे वृहमुंबईचे पुढील वीस वर्षाचे अर्थात २०१४-२०३४ के प्रस्तावित विकास आराखडयाचे पुर्नरचना प्रारुप प्रसिध्द करण्यात आले आहे. सदर आराखडायामध्ये के –पश्चिम प्रभागातील सरदार वल्लभाई पटेल नगर म्हाडा वसाहत जी आपल्या प्रभाग तालिकेतील क्र . K/W -2.05 मध्ये निर्देशित आहे त्या मधील सहकारी गृहनिर्माण संस्था क्र ३ ते २५ वर "SC" अर्थात झोपडपट्टी/समुहाचे आरक्षण दाखविण्यात आले आहे .

सदर वसाहत ही जागतिक बँकेच्या आर्थिक सहकार्याने म्हाडा प्रधिकरणाने BUDP –I अंतर्गत विकसित केलेली असुन LIG,MIG,HIG, प्रवर्गातील सदानिका बनविलेल्या आहेत. वसाहतीमध्ये एकुण ९८ सहकारी गृहनिर्माण संस्था LIG प्रवर्गातील आहेत. विकास आराखडयाचे प्रथम अवलोकन केले असता उपरोक्त ९८ गृहनिमार्ण संस्थापैकी संस्था क्र ३ते२५ ह्या भुखंडावर "SC" अर्थात झोपडपट्टी/समुहाचे गडद तपकिरी रंगात आरक्षण दाखविले आहे.

आपण के –पश्चिम प्रभागातील हरकती / सुचना जाणुन घेण्यासाठी दि. १९.८.२०१४ रोजी घेतलेल्या सार्वाजनिक सुनावणीमध्ये सदर असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी प्रत्याक्षात उपस्थित राहुन उपरोक्त आरक्षण हटवावे अशी मागणी तोंडी स्वरुपात करुन लेखी स्वरुपात त्याची नोंद आपणाकडे केली होती (समावेत प्रत देत आाहोत).



Scanned with CamScanner

# सरदार वल्लभाई पटेल नगर
# रहिवासी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. महाराष्ट्र राज्य /मुंबई/ १९६६/ २०१२ जी.बी.बी.एस.डी.


सदर सुनावण्यांचा /हरकतींचा /सुचनांचा अभ्यास करुन आपल्या विभागाने प्रभाग निहाय पूर्नरचित आाराखडे जनतेच्या निरिक्षणा करिता उपलब्ध केले आहोत आपणाकडे के- पश्चिम प्रभागातुन आलेल्या एकुण ११४ सुचना /हरकती पडताळल्या असता त्यामध्ये कोठेही "SC" आरक्षणाकरिता नोंदविलेल्या सुचना /हरकती प्रसिध्द झाल्या नसल्याचे आढळले आहे. सदर "SC" आरक्षणांतर्गत येणाऱ्या भुखंडांचे सखोल सर्वे उपलब्ध नसल्याकारणाने सुचना / हरकती प्रसिध्द करण्या आल्या नाहीत असे तळटीप नमुद केले आहे .

के- पश्चिम प्रभागच्या पुर्नरचित ELU नकाशा भाग मधील K/W -2.05 संवर्गातील गृहनिमार्ण सरदार वल्लभाई पटेल नगर म्हाडा वसाहातील निम्ननिदर्शित सहकारी गृहनिर्माण संस्थावरिल "SC" अर्थात झोपडपट्टी/समुह आरक्षण तसेच असल्याचे आढळले आहे. सदर गृहनिमार्ण संस्थाची यादी पुढीलप्रमाणे

| क्र. | संस्थेचे नाव | संस्थाक्रमांक | सी.टी.एस क्र. | जुने आरक्षण | नियोजित आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| १ | व.अ.स्वतिक स.गृह.संस्था | ३ | १३७४ब/४७७ | R | Sc |
| २ | व.अ.लवली स.गृह.संस्था | ४ | १३७४ ब /४७८ | R | Sc |
| ३ | व.अ.श्रीकृष्ण स.गृह.संस्था | ५ | १३७४ब/४७९ | R | Sc |
| ५ | व.अ.प्रियदर्शनी सगृह.संस्था | ६ | १३७४ ब/४८० | R | Sc |
| ६ | व.अ.सिध्दीसाई सगृह.संस्था | ७ | १३७४ब/४८१ | R | Sc |
| ७ | व.अ.पृथ्वीदर्शनसगृह.संस्था | ८ | १३७४ब/४८२ | R | Sc |
| ८ | व.अ.मेघा स.गृह.संस्था | ९ | १३७४ब/४८३ | R | Sc |
| ९ | व.अ.सुखसागर सगृह.संस्था | १० | १३७४ब/४८४ | R | Sc |
| १० | व.अ.संकल्पना स.गृह.संस्था | ११ | १३७४ ब/४८५ | R | Sc |
| ११ | व.अ.पुजा स.गृह.संस्था | १२ | १३७४ब/४८६ | R | Sc |
| १२ | व.अ.जयभवानी सगृह.संस्था | १३ | १३७४ब/३४७ | R | Sc |
| १३ | व.अ.साहिल स.गृह.संस्था | १४ | १३७४ ब/३४६ | R | Sc |



Scanned with CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४ | व.अ.साईकृपा स.गृह.संस्था | १५ | १३७४ वं/३४५ | R | Sc |
| १५ | व.अ.श्रीसाई सगृह.संस्था | १६ | १३७४ वं/३४३ | R | Sc |
| १६ | व.अ.कल्पतरु स.गृह.संस्था | १७ | १३७४ व /३४१ | R | Sc |
| १७ | व.अ.अक्षय स.गृह.संस्था | १८ | १३७४ व /३४० | R | Sc |
| १८ | व.अ.बंधुत्व स.गृह.संस्था | १९ | १३७४ व /३८० | R | Sc |
| १९ | व.अ.आकार स.गृह.संस्था | २० | १३७४ व /३७९ | R | Sc |
| २० | व.अ.सुमंगल स.गृह.संस्था | २२ | १३७४ व /३७७ | R | Sc |
| २१ | व.अ.जय स.गृह.संस्था | २३ | १३७४ व /३६८ | R | Sc |
| २२ | व.अ.सागर स.गृह.संस्था | २४ | १३७४ व /३६९ | R | Sc |
| २३ | व.अ.स्मृती स.गृह.संस्था | २५ | १३७४ व /३७० | R | Sc |

तरी वसहातीमधील २८ सहकारी गृहनिमार्ण संस्थापैकी २३ संस्थावर लादण्यात आलेले "sc" अर्यात झोपडपट्टी समुहाचे आरक्षण अतींम आराखड्यात आपण वगळुन उर्वरित गृहनिमार्ण संस्थाप्रमाणेच "R" अर्यात रहिवासी प्रवर्गात पिवळ्या रंगाने निर्देशीत संस्थाना त्याचा समावेश करावा अशी सुचना आम्ही पुन्हा आपणास करत आहोत.

आपण सदर असोसिएशनची दिनांक १९.८.२०१४ ची हरकत व ही सुचना गांर्भियांने घेऊनच अंतीम आराखडा जाहीर करावा अशी आमची मागणी आहे.

धन्यवाद!

आपले

सरदार वल्लभभाई पटेल नगर रहिवासी वेल्फेअर असोसिएशन

महाराष्ट्र राज्य, मुंबई 1966 2012 जी.बी.बी. एस.डी.

"सरदार वल्लभभाई पटेल नगर रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन"

अध्यक्ष सेक्रेटरी खजिनदार




Scanned with CamScanner

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवासी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. महाराष्ट्र राज्य / मुंबई / १९६६ / २०१२ जी.बी.बी.एस.डी.


## महत्वाचे

दिनांक १९/०३/१५

प्रती,

मा अध्यक्ष व सचिव

संस्था क्र _____, व. अ. ______________________ स. ग्र. संस्था मर्या.

*विषय : आपल्या उपरोक्त संस्था भूखंडावर "नियोजित विकास आराखडा २०१४ ते २०३४ बृहन मुम्बई महानगर पालिका "नुसार लागू केलेले "SC" अर्थात झोपडी समूह नामे आरक्षण हटविण्याबाबत निवेदन.*

महोदय /महोदया,

उपरोक्त विषयांकित निवेदन आम्ही आपणास सादर करीत आहोत. **मुंबई शहराचा नियोजित विकास आराखडा २०१४ ते २०३४ अर्थात DP अंतिम करण्याकरिता महानगर पालिकेतर्फे अभियान चालविले जात आहे.** ह्या आराखड्यात आपल्या गृहनिर्माण संस्थेच्या भूखंडावर **तपकिरी रंगातील "SC" अर्थात झोपडी समूहाचे आरक्षण** उठविण्याकरिता लेखी हरकत असोसिअशनने प्राथमिक विभागवार सुनावणीस हजर राहून **दि. १९ ऑगस्ट २०१४** रोजी दाखल केली आहे

प्रस्तुत सुनावणीनंतर आराखड्यास अंतिम स्वरूप देण्याकरिता पुनर्रचित आराखडा (के /प -२.०५) निरीक्षनाकरिता उपलब्ध केला आहे.

***संबंधित आराखडा तपासला असता झोपडी समूहाचे आरक्षण तसेच असल्याने असोसिअशनने लेखी हरकत दि. १९/०३/१५ रोजी महानगर पालिका विकास आराखडा विभागास परत दाखल केली आहे (प्रत समवेत देत आहोत).***

आपल्याही संस्थेने तशाच प्रकारची लेखी हरकत महानगर पालिका विकास आराखडा विभागास देऊन जुन्या रहिवासी अर्थात "R" आरक्षणाची मागणी करून नियोजित "SC" अर्थात झोपडी समूहाचे आरक्षण उठविण्याकरिता लेखी हरकत द्यावी अन्यथा भविष्यातील आपली पुनर्विकास योजना आंशिक बाधित होण्याची शक्यता आहे

**सदर विषयवर सखोल मार्गदर्शन करण्याकरिता संघटनेतर्फे आपल्या विभागात संस्था क्रमांक ३ ते २५ करिता गट सभा आयोजित करण्यात येईल. त्याचे वेळापत्रक आपणास कळवण्यात येईल.**

*विषयाचे गांभीर्य ओळखून आपल्या संस्थेच्या हितास आपण प्राधान्य द्यावे हि विनंती !*

कळावे

आपले विश्वासू


स. व. प. न. रहिवासी वेल्फेअर असोसिएशन

| आनंद जाधव | सुर्यकांत ननावरे | अनिल परदेशी |
|---|---|---|
| ९९६७०९४०९४ | ९८२१७२७९९४ | ९८३३०९२४१८ |
| (अध्यक्ष) | (सचिव) | (खजिनदार) |


प्लॉट नं.७८/बी-१४, व.अं.साथी.स.गृ.सं.म. सरदार पटेल नगर (म्हाडा), वर्सोवा, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३.

www.svpnrwa.in


Scanned with CamScanner




Scanned with CamScanner

# महानगर पालिकेस द्यावयाचा अर्ज नमुना

कार्यकारी अभियंता,

विकास आराखडा

**बृहन्मुंबई महानगर पालिका**

**विषय : अर्जदार व अ______स ग्रु संस्था मर्या, मिळकत पत्रिका क्र _____, के पश्चिम प्रभाग, नकाशा III मधील २.०५ मधील झोपडी /समूहाचे आरक्षण उठविण्याकरिता निवेदन.**

महोदय,

सदर अर्जदार संस्था हि सरदार वल्लभ भाई पटेल नगर म्हाडा वसाहती मधील LIG प्रवर्गातील गृहनिर्माण संस्था आहे. विकास आराखडा २०१४ ते २०३४ मध्ये आमच्या संस्थेच्या भूखंडावर तपकिरी रंगातील "SC" अर्थात झोपडी समूहाचे आरक्षण दाखविले आहे .

सदर संस्था हि महानगर पालिकेच्या मालमत्ता कर विभागाकडे व भूमी अभिलेखानुसार अधिकृत निवासी अर्थात R प्रवर्गात समाविष्ट आहे.

परिणामी नियोजित विकास आराखड्यातील SC अर्थात झोपडपट्टी समूह आरक्षण आपण रद्द करावी अशी लेखी हरकत आम्ही देत आहोत.

कळावे

Scanned with CamScanner

**यशोधर (शैलेश) प. फणसे**

**अध्यक्ष**

**स्थायी समिति**

MUNICIPAL CORPORATION OF GREATER MUMBAI

बृहन्मुंबई महानगरपालिका

महानगरपालिका मुख्य कार्यालय,
मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी क्र. : २२६२ ०८३३ (वै.)
: २२६२ ०२५१ (वि) : २२११


पत्र क्र. म.चि./ ११६२ /अ.स्था.स.

दिनांक : १५/४/१५

प्रिय श्री. बालचंद्रन ह्यांस,

स. न. वि. वि.

सोबत श्री. आनंद जाधव, अध्यक्ष, सरदार वल्लभभाई पटेल नगर रहिवासी वेल्फेअर असोसिएशन हयांजकडून आलेले पत्र जोडीत आहे. सरदार वल्लभभाई पटेल नगर म्हाडा वसाहती मध्ये नियोजित विकास आराखडा २०१४ ते २०३४ नुसार के/पश्चिम -२ मधील नकाशा ०५.III नुसार संस्था क्र. ३ ते २५ वर SC अर्थात झोपडपट्टी समूह आरक्षण उठविण्याबाबत विनंति केली आहे.

तरी कृपया श्री. जाधव हयांनी केलेल्या विनंतीसंबंधी योग्य ती कार्यवाही करण्यात यावी ही विनंति.

कळावे.

आपला स्नेहांकित,

(यशोधर प. फणसे)

श्री. बालचंद्रन,
प्रमुख अभियंता (विकास नियोजन ),
महापालिका मुख्य कार्यालय,
मुंबई.

प्रत :- श्री. आनंद जाधव,
अध्यक्ष, सरदार वल्लभभाई पटेल नगर
रहिवासी वेल्फेअर असोसिएशन,
प्लॉट नं. ७८/बी -१४ व अं. साथी
स.गृ.सं.म., सरदार पटेल (म्हाडा) ,
वर्सोवा, अंधेरी (प.),मुंबई -५३.


**निवास :** ३६/बी-१०२, दीपाश्री को-ऑप. हा. सो., आझाद नगर क्र. २, विरा देसाई मार्ग, अंधेरी (पश्चिम),
मुंबई - ४०० ०५४. दूरध्वनी क्र. : २६७४ ४५४५


Scanned with CamScanner